# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७३ वा ❑ मंगळवार दि.२६ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### गाझा वर ताबा मिळवण्यासाठी इस्रायलची नवी रणनीती

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

गेल्या दोन वर्षांपासून इस्रायल आणि हमासमध्ये भयंकर युद्ध सुरू आहे. सर्व प्रयत्नांनंतरही, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हस्तक्षेपानंतरही, हे युद्ध थांबलेले नाही आणि जमिनीवरील परिस्थिती अजूनही स्फोटक आहे.

दरम्यान, इस्रायलची नवी रणनीती समोर आली आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी आग्रह धरला आहे की येत्या काळात इस्रायल गाझा शहर ताब्यात घेणार आहे. या निर्णयामुळे जगातील अनेक देशांमध्ये खळबळ उडाली आहे, या पावलावर कडक शब्दांत टीकाही केली जात आहे.

इस्रायलच्या सुरक्षा मंत्रिमंडळाने पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या गाझा शहराचा लष्करी ताबा घेण्याच्या योजनेला मान्यता दिली आहे. ही मंजुरी पाच कलमी ध्येयांअंतर्गत देण्यात आली आहे ज्याचे मुख्य उद्दिष्ट हमासला ''निःशस्त्र'' करणे आहे. या निर्णयामुळे या प्रदेशात जवळजवळ दोन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इस्रायलच्या सुरक्षा मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या योजनेत पाच तत्वे समाविष्ट आहेत: हमासला निःशस्त्र करणे, सर्व ओलिसांना परत करणे, गाझाचे निःशस्त्रीकरण करणे, गाझाचे निःशस्त्रीकरण करणे, गाझातील इस्रायली सुरक्षा नियंत्रण आणि हमास किंवा पॅलेस्टिनी प्राधिकरण नसलेले नागरी प्रशासन स्थापन करणे.

इस्रायल सरकारने गाझा सिटी वर नियंत्रण मिळवण्यासाठी गीडिआन्स चेरीओट्स बी नावाची मोठी लष्करी मोहीम जाहीर केली असून यासाठी तब्बल १.३ लाख सैनिकांची तैनाती करण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी ६० हजार राखीव जवानांना पुन्हा सेवेत बोलवण्यात येणार आहे. या मोहिमेत पाच लष्करी विभाग १२ ब्रिगेड सहभागी करून घेतले जाणार आहे. ज्यात पायदळ,रणगाडे, तोफखाना अभियंता यांचा समावेश राहणार आहे.

ऑक्टोबर २०२३ मध्ये जेव्हा हमासने इस्रायलवर हल्ला केला तेव्हा १,२१९ लोक मारले गेले होते, त्यापैकी बहुतेक नागरिक होते. त्याच वेळी, हमास-शासित गाझामधील आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार (ज्याला संयुक्त राष्ट्र विश्वसनीय मानते), इस्रायलच्या प्रत्युत्तराच्या हल्ल्यात किमान ६२,०६४ पॅलेस्टिनी मारले गेले आहेत, त्यापैकी बहुतेक नागरिक आहेत.

इस्रायली सैन्याने म्हटले आहे की ते गाझा शहर ताब्यात घेतील. हा तोच भाग आहे जिथे मोठ्या संख्येने पॅलेस्टिनी राहतात. फॉक्स न्यूजशी बोलताना पंतप्रधान नेतन्याहू म्हणाले की, आम्ही गाझा शहर ताब्यात घेण्याचा विचार करत आहोत जेणेकरून आमची सुरक्षा मजबूत करता येईल आणि आम्ही हमासची दहशत संपवू शकू. नेतन्याहू यांनी असेही म्हटले आहे की ते ही जबाबदारी स्वतंत्र सरकारकडे सोपवू शकतात.

इस्रायली सैन्याने गेल्या ५६ वर्षांपासून गाझा, वेस्ट बँक आणि पूर्व जेरुसलेमसह पॅलेस्टिनी भूभागावर कब्जा केला आहे. २००७ पासून इस्रायलने गाझावर नाकेबंदी देखील लादली आहे, ज्यामुळे गाझाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली आहे, बहुतेक लोकांना तेथून बाहेर पडता आले नाही, त्यांना आरोग्यसेवा सारख्या अत्यावश्यक सेवांपासून बंदी घातली आहे आणि पॅलेस्टिनी लोकांना एकमेकांपासून दूर केले आहे.

अमेरिकेच्या पाठिंब्याने इजिप्त आणि कतार इस्रायल आणि गाझामधील संघर्षात कायमस्वरूपी युद्धबंदी सुनिश्चित करण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करत आहेत. हमासने मंजूर केलेल्या प्रस्तावात सुरुवातीला ६० दिवसांसाठी युद्धबंदीची चर्चा आहे. इस्रायली बंधकांना टप्प्याटप्प्याने सोडण्यात येईल, त्या बदल्यात इस्रायल काही पॅलेस्टिनी कैद्यांना सोडेल आणि गाझामध्ये मानवतावादी मदत प्रवेश करण्यास परवानगी देईल. परंतु असे दिसते की इस्रायल या प्रस्तावाशी सहमत नाही.

वृत्तानुसार, एका वरिष्ठ इस्रायली अधिकाऱ्याने सांगितले की, नेतान्याहू सरकार कोणत्याही करारात सर्व बंधकांना एकाच वेळी सोडण्याच्या मागणीवर ठाम आहे.

एकीकडे नेतन्याहू गाझा ताब्यात घेण्याची योजना बनवित असताना नेतन्याहू यांना अंतर्गत विरोध देखील होत आहे. इस्रायलमध्ये नेतन्याहू यांच्या धोरणांना पूर्ण पाठिंबा मिळत नाही. कुटुंबातील अनेक सदस्य अजूनही हमासच्या ताब्यात असल्याने, ते इस्रायलचे हे पुढचे पाऊल विनाशकारी मानतात. मोठी गोष्ट म्हणजे इस्रायली लष्कराच्या प्रमुखांनीही गाझा ताब्यात घेण्याच्या योजनेला विरोध केला आहे, त्यांचा युक्तिवाद असा आहे की हमास आता तितका शक्तिशाली राहिलेला नाही.


## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.


# साकेतच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी आठ पुस्तकांचे प्रकाशन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – सध्या वाचनापेक्षा मोबाईल आणि मॉल समाजाच्या चर्चेचे, अस्तित्वाचे विषय झाले आहेत. मध्यमवर्गाला प्रेरणा देणाऱ्या समाजसेवकांनी विश्वासार्हता गमावली आहे, तर कधी काळी महाराष्ट्र हलविणाऱ्या साहित्यिकांनी त्यांचे स्थान गमावले आहे. त्यामुळे या दोघांनाही नवा बिंदू शोधावा लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी रविवारी, २४ रोजी येथे केले.

साकेत प्रकाशनाला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त रेल्वे स्टेशन भागातील सौमित्र हॉलमध्ये आयोजित साकेत सुवर्णमहोत्सव कार्यक्रमात बंग बोलत होते. मंचावर राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशकुमार कदम, ज्येष्ठ साहित्यिक आणि प्रकाशक बाबा भांड आणि आशा भांड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. बंग म्हणाले, पूर्वी साहित्यिकांच्या लेखनाने अवघा महाराष्ट्र हलत होता. तत्कालीन सामाजिक कार्यकर्तेही त्यावेळी मध्यमवर्गाला प्रेरणा देत असत. पण सध्याच्या युगात मात्र दोघांनीही हे स्थान गमावले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाने समाज झपाट्याने बदलला. सध्या कुणाला पुस्तक वाचायचे आहे, असा प्रश्न पडतो. कारण प्रत्येकाला अर्ध्या मिनिटाची रिल पाहण्याची सवय लागली आहे. मग, अनेक वर्षानंतर कोणते साहित्य टिकेल? माझ्या मते महाराष्ट्रात ज्ञानोबा, तुकोबा आणि विनोबा हेच खरे साहित्यिक झाले. कारण त्यांच्या लेखनाला चिरंतन मूल्य आहे.

खेडेगावातील बाबा भांड यांनी आजतागायत व्यक्तिगत वाचन आणि प्रोत्साहनातून भरपूर लेखन केले. त्यामुळे ६५ वर्षे ते चतुरस्त्र लेखक म्हणून महाराष्ट्रासमोर आले. तंट्या, दशक्रिया, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रग्रंथ हे त्यांचे महत्त्वाचे लेखन होय. सयाजीरावांना महाराष्ट्रामधील महापुरुषांच्या केंद्रस्थानी बसवण्याचे काम भांड यांनी केले. हे त्याचे लाइफ मिशन आहे. त्याचबरोबर व्यावसायिक यशस्वी प्रकाशक म्हणूनही त्यांची इतिहासात निश्चितपणे नोंद घेतली जाईल.

**८ पुस्तकांचे प्रकाशन**

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिनेश पाटील लिखित सुवर्ण साकेत : ग्रंथ प्रकाशनाची ५० वर्षे, साथसंगत, साथसंवाद, धारा भांड-मालुंजकर संपादित बाबा भांड : एक सहवाचन,



बाबा भांड : कर्तव्यसाधना, बाबा भांड लिखित माझा लेखनप्रवास, डॉ. राजेंद्र मगर संपादित पत्रसंवाद, साकेतचे आधारस्तंभ या आठ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

लेखक होण्याचे स्वप्न बघत असताना प्रकाशक झालो. गुरुवर्य भालचंद्र नेमाडे यांच्या मार्गदर्शनानुसार वाटचाल केली. सयाजीराव गायकवाड यांच्यावरील संशोधन प्रकल्पाने सर्वाधिक समाधान दिले'', असे मनोगत भांड यांनी व्यक्त केले. यावेळी राज्यपाल बागडे व कुलपती कदम यांचीही भाषणे झाली धारा भांड-मालुंजकर यांनी प्रास्ताविक केले. सारंग टाकळकर आणि गौरी साळवेकर यांनी सूत्रसंचालन, तर प्रतिमा भांड यांनी आभार मानले.

# गांधी : वाद आणि वास्तव गांधी तत्त्वज्ञानाची मिमांसा करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ-डॉ. इंगळे

## मसापच्या वार्षिक ग्रंथपुरस्कारांचे वितरण

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – रामनामाचा जप करणाऱ्या गांधीजींबद्दल नंतरच्या काळात वाद निर्माण केले गेले. त्यांच्यावरील आक्षेप गांधी:वाद आणि वास्तव ग्रंथातून खोडले गेले आहेत. गांधी तत्त्वज्ञानाची मिमांसा करणारा हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन समीक्षक डॉ. कैलास इंगळे यांनी रविवारी, २४ रोजी येथे केले. मराठवाडा साहित्य परिषदेचे वार्षिक ग्रंथपुरस्कार वितरण कार्यक्रम नांदापूरकर सभागृहात पार पडला. यावेळी सेवानिवृत्त विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह डॉ. दादा गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**४ पुरस्कार वितरित**

नरहर कुरूंदकर वाङ्मयपुरस्कार अनोखे थायलंड या पुस्तकासाठी वंदना पारगावकर यांना प्रदान करण्यात आला. म.भि. चिटणीस वाङ्मयपुरस्कार गांधी : वाद आणि वास्तव या पुस्तकासाठी सचिन कुसनाळे, बी. रघुनाथ वाङ्मयपुरस्कार नांगरमुठी कादंबरीसाठी पांडुरंग मुरारी पाटील आणि पुस्तक व्यवहारातील लक्षणीय कामगिरीसाठी रा.ज. देशमुख स्मृतिपुरस्कार कैलाश पब्लिकेशन्सचे अनिल अतकरे यांना प्रदान करण्यात आला. रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**गांधीजी विश्वगुरू**

डॉ. कैलास इंगळे आणि डॉ. रमेश रावळकर यांनी पुरस्कार विजेत्यांच्या ग्रंथांवर भाष्य केले. मी फक्त आंतरजातीय विवाहाला जाईन असे सांगून गांधीजींनी सामाजिक समतेची भूमिका मांडली होती. अस्पृश्य विद्यार्थी





असलेल्या शाळेलाच ते भेट देत असत. हीच कारणे त्यांच्या हत्येसाठी कारणीभूत ठरली, असे लेखक सचिन कुसनाळे यांनी ग्रंथातून मांडले आहे. काहीजण आता स्वत:ला विश्वगुरू उपाधी लावत आहेत. पण, गांधीजी त्याच काळात विश्वगुरू झाले होते. सध्या जातीधर्माच्या नावावर सामाजिक मोडतोड केली जात आहे. गावांची नावे बदलून सामाजिक तेढ निर्माण केली जात आहे. अशा काळात या पुस्तकाचे लेखन दिशादर्शक आहे, असे इंगळे म्हणाले. डॉ. विष्णू सुरासे यांनी सूत्रसंचालन करून आभारप्रदर्शन केले.


॥ ज्योतिर्मय ॥ साहित्याचे विद्यापीठ

📞 7743918559
7743818559

## सर्व साहित्यिकांसाठी खुशखबर !




*आपल्या "ज्योतीर्मय 2025" दिवाळी अंकाचे काम सुरु झाले आहे व ज्यांना आपले साहित्य पाठवायचे असेल त्यांनी त्यांचे साहित्य माझ्या 7743818559 या व्हाटसपवर पाठवावे.*

*साहित्यासोबत आपले संपूर्ण नाव, पोस्टल ॲड्रेस (पिनकोड सहित) मोबाईल नंबर, पासपोर्ट साईज फोटो पाठविणे आवश्यक आहे.*

*दिवाळी अंकासाठी रु. 500/- माझ्या 7743918559 या नंबरवर फोन पे किंवा गूगल पे द्वारे पाठवावेत, ज्यांनी पैसे पाठविले त्यांचेच लेख, कविता, साहित्य दिवाळी अंकात समाविष्ठ केले जाईल. दिनांक 15 सप्टेंबर साहित्य स्वीकारण्याची शेवटची तारीख आहे या तारखेनंतर साहित्य स्वीकारले जाणार नाही. पेमेंट सुद्धा साहित्य पाठविताना जमा होणे आवश्यक आहे नंतर आलेले साहित्य घेतले जाईल याची शक्यता सांगता येणार नाही. कोणाला काही अडचण असल्यास माझ्याशी संपर्क करावा, (पैसे पाठविल्यानंतर मला त्याचा स्क्रीनशॉट पाठविणे आवश्यक आहे)*

*- संजय व्यापारी*

*संपादक, ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ*

*सूचना : ▪ दिवाळी अंक रजि. पोस्टाने प्रकाशना नंतर तीन दिवसात घरपोच येईल. ▪ साहित्य 600 शब्दांपर्यंत असावे. ▪ साहित्य जसेजसे येईल त्याप्रमाणे पेजेस सेट होतील. ▪ साहित्याचे विषय शक्यतो मनोरंजनात्मक असावेत. ▪ साहित्य स्वीकारणे किंवा नाही स्वीकारणे हे संपादक ठरवतील. ▪ प्रत्येक साहित्यिकाला प्रत्येकी एक लेख व एक कविता पाठवता येईल. फक्त कविता असल्यास दोन कविता पाठविता येतील. ▪ साहित्य पाठविताना दिवाळी अंकासाठी असे स्पष्ट मेन्शन करावे. ▪ दिवाळी अंकाबद्दल काही सूचना असतील तर मला 7743818559 या माझ्या व्हाट्सअप नंबरवर पाठवाव्यात.*


*दिवाळी अंकासाठी काही विषय देण्यात येत आहेत त्या विषयावर किंवा इतर कोणत्याही विषयावर लेख चालेल. ▪ लेखासाठी विषय - 1. सण- उत्सवाचे बदलते स्वरूप. 2. आपली संस्कृती जपा. 3. संपत चाललेला संवाद आणि परिणाम. 4. आमच्या काळातील दिवाळी. 5. फास्ट फूड किती घातक. 6. परत अध्यात्माकडे... 7. आज्जी - आजोबांच्या गोष्टी हरवल्या... 8. आरोग्य किती महत्वाचे. 9. नवीन रेसिपीज. 10. मोबाईलचे चांगले व वाईट परिणाम.*

Wing B3, Flat 701, WHISTLING PALMS CHS,Mankar Chowk, Kaspate Wasti, Wakad, Pimpri-Chinchwad, Maharashtra 411057

jyotirmaysahitya@gmail.com https://jyotirmaysahitya.com


## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 26



बारा राशीपैकी अकरावी रास कुंभ' आहे. ही राशी 'वायु' तत्वाची असून या राशीचा रंग निळा आहे. 'पुरुष प्रधान' रास आहे आणि आराध्य वृद्ध 'शमी' आहे.

समाज सुधारक व्यक्तीमत्वे खूपदा या राशीची असतात. समाजाला वेगळा विचार मांडून बदलवण्याची क्षमता या राशीच्या जातकांमध्ये असते. या राशीचे स्वामी 'शनि महाराज आहेत. त्यामुळे या राशीच्या जातकांच्या उत्तरार्धातील वयात यांना लाभ होतात.

'धनिष्ठा, 'शततारका 'आणि 'पूर्वा भाद्रपदा' या तीन नक्षत्रांवर जन्मलेल्या व्यक्तीची जन्मरास ही 'कुंभ' असते, या नक्षत्रांचे आराध्य वृक्ष अनुक्रमे 'शमी', 'कदंब'आणि 'आम' वृक्ष असून त्यांच्या नक्षत्र देवताही अनुक्रमे 'वसु' (गंधर्व); वरुण' आणि 'अजैकपाद' या आहेत.

'वास्तुशास्त्र पेटींग' निर्मिती साठी ही झाली जन्म कुंडली नुसार मूलभूत माहिती....!! याशिवाय त्या राशीच्या व्यक्ती ज्या वास्तुमध्ये निवास करतात त्या वास्तुचीही जन्म कुंडली शोधावी लागते. शेवटी 'होरा कुंडली'.... या पैकी नंतरच्या दोन कुंडली ह्या, वैयक्तिक माहितीवर आधारित असतात. ही माहिती फारच वैयक्तिक आणि गोपनीय असते. या माहितीमध्ये जातकाचे गुणदोष, त्याचे निरिक्षण, स्वभाव गुण आदी बाबीचा समावेश असतो. नक्षत्र आणि राशी त्यांचे स्वामी, त्यांच्या देवता यांचे मंत्र असतात. त्यांच्या अक्षरांचा उपयोग या 'वास्तूशास्त्र पेंटिंग' मध्ये अगदी अचुकपणे करण्याची काळजी घेतली जाते. अशा प्रकारचे वैयक्तिक 'पेंटींग' बनवतांना संबंधित जातकालाही काही सूचना केल्या जातात.

वाचकहो या शास्त्रामध्ये केवळ आणि केवळ रंगाकारांची किमया आहे. "रंग देवता" ही आस्तिक आणि नास्तिक, ज्ञानी आणि अज्ञानी,साक्षर आणि निरक्षर अशा साऱ्यांनाच दृश्यस्वरुपात दिसते. म्हणूनच या देवतेच्या 'सकारात्मक रंग संकल्पना व्दारे जातकाला, त्याच्या स्वप्न पूर्ततेचा आनंद घेता येतो....

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

बसल्या सासू सुना
म्हणती जावा_जावा
गवळी दादा माझा
पहिल्या उमदीचा रावा ||२२५||

हसून खेळून मला
मरून जायचं
बाप व मायच
नाव कैलासी न्यायाच ||२२६||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# मोल



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

श्रीमद भागवताच्या दशम स्कंधात आणि श्रीकृष्ण धारावाहिक मध्ये एक सुंदर कथा येते. गावभर फळांचा टोपली घेऊन फिरणारी एक म्हातारी. डोक्यावर उन्हाचा तडाखा, अंगावर श्रमांचा थकवा, पण ओठांवर परमेश्वराचे नाम. तिच्याजवळ ताजी आणि गोड फळे असतात ते संपूर्ण गाव फिरते आणि जी जी व्यक्ती समोर दिसते त्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या जवळील फळे घेण्याचा आग्रह करते परंतु दुर्दैव असे की कोणीच तिच्या जवळील फळे घेत नाही. तरीही परमेश्वरावरील तिचा विश्वास ढळत नाही " ही परमेश्वराचीच इच्छा असावी. कधीतरी तो माझं ओझं हलकं करेल."



फिरता फिरता अखेर तिचे पाऊल अखेर कृष्णाच्या वाड्यासमोर थांबतं. तिथे फळ घ्या फळ म्हणून दोन-तीन वेळा आवाज देऊन ती विश्रांतीसाठी खाली बसते. योजना जणू ईश्वराचीच असावी. विश्रांती तिथेच मिळणार आणि श्रमही तेथेच हरण होणार.

तिचा आवाज ऐकून निरागस गोड असा छोटा कृष्ण घरातून बाहेर येतो. ती कृष्णाला पाहून आनंदते. " बेटा, ताजी गोड फळं आहेत. घे ना. "

कृष्ण म्हणतो, " ती सगळीच फळं मला दे. "

म्हातारी आनंदली. म्हणाली, "हो हो देईन बाळा, पण मोल द्यावं लागेल."

कृष्ण निरागसपणे विचारतो, "मोल म्हणजे काय ?"

ती समजावून सांगते


"लल्ला, आपण जेव्हा कोणाकडून काही घेतो, तेव्हा त्याच्या बदल्यात काही तरी देतो, त्यालाच मोल म्हणतात."

कृष्णाचं बोलणं मोठं गोड आणि मन मोहून घेणारं आहे. तो तिला म्हणतो, "माझी आई तर मला रोज दही, दूध, लोणी देते. मला हवं ते सगळं सगळं देते. पण माझ्याकडून कधी काही घेत नाही. मग ती मोल का मागत नाही ? गोपी सुद्धा मला दही दूध लोणी देतात माझ्यावर खूप प्रेम करतात पण त्या माझ्याकडून काही घेत नाहीत."

त्या बालसुलभ प्रश्नानं म्हातारी विचारात पडते. हा प्रश्न आपल्यालाही विचारमग्न करतो. आणि सत्य उलगडतं. खरं मोल प्रेमाच्या नात्यांत असतं, पैशांत नव्हे. प्रेमाचं मोल किंवा किंमत केली जाऊ शकत नाही.

पण तरीही तिला काहीतरी द्यायचं म्हणून बालसुलभ भावनेतून कृष्ण म्हणतो, "मी तुला मिठी मारली, तुला आई म्हटलं, तर चालेल का?"

म्हातारी थबकते. तिच्या डोळ्यांत पाणी तरळतं."मी खालच्या जातीची बाळा, माझं एवढं भाग्य कुठे ?" पण कृष्ण तिच्या जवळ जातो. त्याच्या कोमल हातांची मिठी तिच्या गळ्याभोवती पडते. यापेक्षा दुसरं मोठं भाग्य कोणतं ? तो तिला आपल्या निरागस स्पर्शाने आईचा मान देतो. म्हातारीचे सगळे श्रम हरण होतात. तिला जणू स्वर्ग मिळाल्याचा भास होतो. या कथेत पुढे असेही म्हटले आहे की कृष्ण तिला देण्यासाठी घरातून धान्य घेऊन येतो. परंतु आणता आणता बरेचसे त्याच्या हातून सांडते. परंतु जे काही थोडे त्याच्या हातात उरलेलं असतं ते तो त्या म्हातारीला देतो. आणि म्हातारी जेव्हा घरी जाते तेव्हा त्या धान्याच्या मोजक्या दाण्यांचे रूपांतर दुर्मिळ रत्न आणि हिरे माणकांमध्ये झालेले असतं. (क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


# शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

खरं या व्यापक विश्वात अनेक गुढ तत्वे आहेत अनाकलनीय गोष्टी आहेत आपण या समासाच्या आधी विज्ञान व शास्त्र याचा अभ्यास केला आहेच त्यामुळे त्याच्या अनुशंगाने आपण पहाता आत्मस्वरूप अनंत असल्याने ज्याला ज्या अंगाचे दर्शन होते त्याला अनुसरून तो आपले मत मांडतो. आत्मज्ञानी पुरूषाच्या अनुभवामध्ये सर्व अंगे एकत्वाने गोळा होतात. त्यासाठी अतिशय सुक्ष्म व व्यापक विचार मात्र केला पाहिजे.

पूर्वी होऊन गेलेल्या सर्व थोर ज्ञानी पुरूषांना असे आत्मज्ञान प्राप्त झाले होते. सर्व वेदांचे रहस्य आत्मज्ञान आहे. वेदविद्येचे जाणते संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली ,तुकाराम महाराज हे आपल्याला रोजच्या नित्यपाठार्तीं नावे आहेत. त्याशिवाय महामुनी वशिष्ठ,व्यास समाधानी शुक आणि नारद ,महाज्ञानी जनकादिक या आत्मज्ञानाने थोर पदाला पोहोंचले. वामदेवादी योगेश्वर, वाल्मिकी, ऋषीश्वर अत्री शौनकादि हे सर्व वेदांन्त तत्वज्ञानाचे रहस्य जे आत्मज्ञान मिळवण्यात यशस्वी झाले व परमपदाला पोहचले. सनकादि थोर ज्ञानी आणि आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ हे नाथपंथी महायोगी व आणखी असंख्य असंख्य थोर महात्म्याने आपले जीवन आत्मज्ञानाने सफळ संपूर्ण केले. मोठमोठे सिद्धमुनि महान अनुभवी या सर्वाच्या अंतरंगाची जी अवस्था म्हणजेच आत्मज्ञान होय. ज्या ज्ञानाच्या आनंदाने महादेव निरंतर डोलत असतो व तो या चराचर सुष्टीला आशिर्वाद देत असतो.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामस्मरण व एकाग्रता

ज्योतिर्मय साहित्य

नामस्मरण करताना चित्त एकाग्र का होत नाही ? त्याकरिता काय करावे ? नामस्मरण करीत असताना हजार तऱ्हेचे विचार मनात येतात हे खरे. त्यांना आवरण्याचा पहिला उपाय म्हणजे त्या विचारांच्या मागे न जाणे. विचार मनात आले तर त्या विचारांना फाटे फोडून ते वाढवू नयेत; म्हणजेच मनोराज्य करू नये. विचार येतील तसे जातील, तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे, त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. एकाग्रता झाल्याशिवाय नाम घेण्यात अर्थ नाही, आणि नामाशिवाय एकाग्रता होणार नाही, या संशयात न पडता साधे, सोपे नाम घ्यावे म्हणजे आपोआप एकाग्रता येईल. दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. आपल्याला विषयाची आवड असते म्हणून विषयाचे सेवन करताना आपण एकाग्र होतो; मग त्याचप्रमाणे विषयाच्या ऐवजी आपण परमात्म्याची आवड धरली तर त्याच्या ठिकाणीही एकाग्र होता येणार नाही का ? म्हणून, आज विषयाची जितकी आवड आहे तितकीच देवाच्या प्राप्तीबद्दलही आवड ठेवावी, म्हणजे आपल्याला त्याच्या ठिकाणी एकाग्र होता येईल. एकाग्र होणे म्हणजे त्या ठिकाणी समरस होणे. मीठ पाण्यात टाकले म्हणजे ते पाण्याहून वेगळे राहते का ? योग केल्याने एकाग्र होता येईल खरे, पण जोपर्यंत समाधी आहे तोपर्यंतच ती एकाग्रता टिकेल. सर्वांभूती भगवद्भाव पाहणे हेच खरे एकाग्रतेचे साधन. सर्व ठिकाणी तोच भरलेला आहे असे समजल्यावर द्वैत कुठे राहिले ? आणि जिथे द्वैत गेले तिथे आपोआप एकाग्रता आलीच. अशी एकाग्रता साधते तीच खरी समाधी होय.

मनुष्य अगदी एकटा असला किंवा एकान्तात असला तरी आपल्या कल्पनेने तो अनेक माणसे आपल्या भोवती गोळा करतो. विशेषत: विद्वान् लोकांना कल्पना जास्त असतात. तेव्हा कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या; त्यातच खरे हित आहे. कल्पनेच्या पलीकडे असणारा परमात्मा आपण कल्पनेत आणून सगुण करावा, आणि तिथेच आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा.

५. मन एकाग्र होत नसेल तर न होवो, पण नामस्मरण सोडू नये.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

संपूर्ण ब्रम्हांडाला जन्म देणारी मूळ जननी आहे. या संपूर्ण ब्रम्हांडाचा विलयही ती संपूर्णपणे स्वतः करून स्वतः परब्रम्हामध्ये लीन होते. ब्रम्हांडाचे प्रकटीकरण आणि विलय हे दोन्ही होत राहतात. यामुळेच या महामायाच्या द्वारा उत्पन्न झालेल्या जगतास सत्य मानता येत नाही. तसेच त्याला नित्यही मानता येत नाही. विज्ञाना द्वारा जे अनुभव येतात ते सत्य म्हणून स्वीकारले तर ते आपले अज्ञान ठरते, कारण मुळातच पूर्ण ब्रम्हांड हे असत्य अनित्य असेच आहे.

परब्रम्ह नित्य सत्य आहे तर माया असत्य आहे.

सत्य त्यालाच म्हणतात जे नित्य आहे.

विज्ञानावरील सत्य स्थापनेला अज्ञान म्हणतात

ज्ञान विज्ञान आणि अज्ञान या तीनही शब्दांची फोड आपण आता पाहिली आता आपण हा संदर्भ ध्यानी घेऊन अभंगाला सुरुवात करूयात.

विज्ञानाचे ज्ञान अज्ञानी घनवट
ज्ञाने अज्ञान नीट लाविले दिसे
मी तू हे मात हरपले दृष्टांत
हृदयी हृदयस्त निजतेजे

आपण पाहिले की या ब्रह्मांडातील सर्व वस्तू गतिवान आहेत. या गतींचा अनुभव म्हणजेच विज्ञान. मूळ ब्रम्हांड हेच असत्य (अनित्य) असल्याकारणाने विज्ञानाद्वारे येणारे अनुभव हे सत्य समजणे, म्हणजे ते नित्य आहेत असे समजणे, हे केवळ अज्ञान आहे. ज्यावेळेस ज्ञान प्राप्त होते. म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो त्यावेळेस या देहातील पंच तत्त्वांची आटणी होत असते. ब्रम्हांडात दीर्घकाळानंतर होणारा प्रलय तसा या देहातही यादरम्यान होत असतो. या देहातील मरके सडके परमाणु पेशी बदलून त्या जागी त्या अमेय पेशींनी भरून काढल्या जातात, व देह होय सोनियाचा अशी स्थिती येते. हा पंचतत्व विलय होऊन आत्म्याची नित्यता अनुभवयास येते. हे ज्ञान प्राप्त झाल्यावर, आपण ज्याला विज्ञान समजत होतो, तेही मुळात अज्ञान आहे, अनित्य आहे, अशाश्वत आहे, हे निदर्शनास येते. यामुळेच ज्ञानाने, विज्ञान व अज्ञानाला वाटेला लावले आहे असे म्हटले आहे.

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

(क्रमशः)

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

४५. शेवटचा दिस....!

भौमनौमी दिनी यावे। यात्रे सफल ते करावे।
दिस चैत्राचे असावे। उदित सूर्ये हसावे।।
वस्त्र जीर्ण ते सांडावे। माये सांगता करावे ।।
मज आत्मरूप द्यावे। निजस्वरूपे दावावे।
मी चरम गीत गावे। मुखी नाम तुझे यावे।।
नुपूरे पायी असावे। मधु झंकार ऐकावे।
मंथरे गती येयावे। सुंदरे तुला पहावे।।
मी आर्त्तभावे नमावे। तू अभयदान द्यावे।
स्मितहास्य विलसावे। माझे समीप बसावे।।
मस्तक हाती धरावे। अंकावरती ते घ्यावे।
तुझिये स्तन्य पाजावे। मुखी तांबूल ठेवावे।।
मी तव नेत्री पहावे। मद्बिंब मला दिसावे।
मृण्मये हिरण्मयावे। नेत्रपल्लवे मिटावे।।
संचिता मागे नुरावे। निर्वेद स्थायी होआवे।
शब्द आकाशी विरावे। नि:शब्द सारे होआवे।।



# आरोग्य संजीवनी

## कशी घ्यावी डोळ्यांची काळजी.....

ज्योतिर्मय साहित्य

डोळे हा अवयव सर्वात महत्वाचा आहे, मात्र डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक आहे, डोळ्याची काळजी कशी घ्यावी याविषयी थोडक्यात पण अतिशय महत्वाची माहिती आहे, आपण डोळ्याची काळजी तर करत नाही, पण डोळ्यांना अपाय होईल असं काही करतो,

तर डोळ्यांना अपाय होवू नये यासाठी काय काळजी घ्यावी हे जाणून घेणे देखील महत्वाचे आहे.

पुरेशी झोप घ्यावी यासाठी रात्री जागरण करु नये व दिवसा झोपू नये.

दिवसातून दोन वेळा साध्या गार पाण्याने डोळे स्वच्छ करा/धूवा, असं केलं तर तुम्हाला आयुष्यात डोळ्याच्या समस्या येणार नाहीत.

डोळ्यांवर ताण येऊ देऊ नये. यासाठी अधिक वेळापर्यंत , मोबाईल पाहू नये. संगणकावर सलग काम करु नये. मधून-मधून थोडी विश्रांती घ्यावी.

वाचण, शिवणकाम करताना डोळ्यांवर ताण येतो आहे असे वाटल्यास थोडा वेळ विश्रांती घ्यावी.

प्रवासामध्ये वाचू नये.

अपुऱ्या प्रकाशात लिहिणे, वाचणे इ. गोष्टी करणे टाळावे.

अति प्रखर प्रकाशाकडे अधिक वेळ पाहू नये. सूर्यकिरणांपासून डोळ्यांच्या रेटिनावर गंभीर परिणाम होवू शकतो, तेव्हा काळा गॉगल प्रखर उन्हात वापरा.

सुर्यग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहू नये.

पित्तवर्धक आहार उदा. अतितिखट, खारट, उष्ण, मसालेदार, चमचमीत, तेलकट पदार्थ अधिक खाऊ नयेत.

डोळ्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक उत्पादनाची पाहणी करावी. क्लिनिंग सोल्युशन, कॉन्टॅक्ट लेन्सेस आमि आय ड्रप्स यांची एक्सपायरी डेट तपासून घ्यावी. कॉन्टॅक्स लेन्स वापरताना अधिक काळजी घ्यावा.

डोळ्यांना सूज अथवा डोळयांखाली काळी वर्तुळे आल्यास चंदन आणि जायफळाची पेस्ट डोळ्यांभोवती रात्री लावून ठेवा. सकाळी धुऊन टाका. यामुळे डोळ्यांना गारवा मिळून त्याखालील काळी वर्तुळे नाहीशी होतील. अथवा टोमॅटो आणि लिंबाचा रस डोळ्यांच्या खाली लावून तो सुखल्यावर चेहरा धुवून घ्यावा. नियमित असे केल्याने डोळ्याखालची वर्तुळे हळू-हळू कमी होतात. तसेच बदामाच्या तेलाने जवळपास २० मिनिटे डोळ्यांभोवती मसाज करावा, पुदीन्याचा रस लावल्यानेही काळी वर्तुळे कमी होतात, काकडीच्या किंवा बटाटयाच्या चकत्या डोळ्यांवर ठेवल्यामुळे डोळ्याखालील फ ुगीरपणा सूज कमी होऊन तिथली त्वचा ताजीतवानी होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

काकडीचा रस काढा आणि तो चेहऱ्याला लावा किंवा तो थोडा असेल तर तो डोळ्याभोवती लावा. दहा ते पंधरा मिनिटे त्याठिकाणी ठेवा आणि पंधरा मिनिटांनी धुवून टाका. त्यामुळे डोळ्यावरचा ताण कमी होईल. हाच काकडीचा रस बटाट्याच्या रसात मिसळून तो चेहऱ्याला लावून असाच दहा पंधरा मिनिटे ठेवून तो स्वच्छ पाण्याने धुवावा. त्याने काळी वर्तुळे तर जातातच परंतु काही कारणांनी चेहऱ्याला सूज आली असेल तर ती सूज उतरण्याससुध्दा मदत होते.

डोळे लाल झाले असल्यास किंवा डोळ्यांविषयी काही तक्रार असल्यास सातत्याने ड्रॉप्सचा वापर करू नये, असं केल्याने अनेकवेळा त्याचे उलट परिणाम होऊ शकतात.

डोळ्यांच्या आरोग्यासाठी व्यायामालाही महत्त्व आहे. डोळ्यांचे दोन महत्त्वाचे व्यायाम आपण घरच्या घरीही करू शकतो.

(क्रमशः)

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कांहीं माणसे अशी असतात की आपल्या कार्यात विघ्ने येतील तर ते काम आरंभच करीत नाहीत. दुसरा एक वर्ग असा आहे ते प्रारंभ करतात पण विघ्न आले की सोडून देतात. सामा या जब असेच असतात. तिसरा वर्ग असा असतो की ते आपले कार्य पूर्णत्वाला नेतात. कितीही विघ्ने आली तरी करतात. रावण म्हणे मी आता मागे फिरणार नाही मी असे केले तर नामुष्की होईल. मला कोण अडविल मी रावण आहे तुला कसले अपशकुन होतात त्याला मी मोजत नाही.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

नाथ. म. कुंभकरणाचे छान वर्णन करतात. तो उठावा म्हणून त्याचे जवळ ढोल बडविले त्याचे अंगावर हत्ती नाचविले. त्याला जाग आली नाही. शेवटी त्याचे जवळ अन्न पदार्थ ठेवले. मग तो उठला. तो म्हणे मला कशाला उठविले.

राम बरोबर युद्ध करण्यासाठी. कोण राम ? अरे त्याची पत्नी मी पळवून आणली ना.

तुला पत्नीची कोणती कमतरता होती.

तुझ्याशी लग्न करायला ती तयार नाही का?मग तू रामाचे रूप घेऊन जा. ती तुझ्या पाया पडेल. तिचे पातिव्रत भंगणार मग तू तिच्याशी लग्न कर. रावण म्हणाला अरे मी रामाचे रूप घेऊन गेले होतो पण मी रामाचे रूप घेतले की माझ्यातील काम नाहीसाच होतो. मग काय करू. बिभीषण पुन्हा पुन्हा रावणास तू युद्ध करू नको असे सांगत होते. पण रावणाने त्याचा लाथ मारून हाकलले. हा अपमान झाल्यावर बिभीषण त्यांच्या चार साथीदारासह रामास येऊन भेटले. (क्रमशः)




# फुलमाला – तुळस

सौ. माधुरी म. इनामदार
मिरज

पहाट माझी अत्यंत आवडती वेळ. मनाला अलवार साद घालणारी. त्यामुळेच कदाचित भूप रागाच्या स्वर तारा छेडील्या गेल्या आणि मी रोज पहाट सदर वर लिहिणे सुरू केले त्याला प्रतिसाद मिळत गेल्यावर देवांच्या वर कविता लिहिल्या त्याचे ही खूप जणांनी कौतुक केले. असेच एक दिवस मी काढलेली जास्वंद फुलांच्या रांगोळीतल्या गणपती आणि त्या फुलावर लिहिले ते खूप जणांना आवडले. मग सहज सुचत गेले आणि रोज प्रभात सदरात मी नवीन फुलांवर लिहायला सुरुवात केली. स्टेटस, काव्य ग्रुप आणि फ `सबुक अशा विविध मार्गांनी मला वाचकांचा भरपूर प्रतिसाद मिळत गेला.. माझ्या फुलांच्या सदराची वाट बघणारे आणि प्रोत्साहन देणारे आणि मनापासून कौतुक करणारे मला अनेक जण भेटले. त्यांच्या प्रतिसादाने मी भारावून गेले. काहींनी मला ब्लॉग सुरू करण्याचे सुचविले, तर काहींनी पुस्तक आणि ई बुक काढा अशीही प्रेमाची मागणी केली. अनेक जणांच्या सुंदर अभिप्रायांनी मनात घर केले. माझा वाचक वर्ग आणि मैत्र वर्ग ही वाढला. आजपर्यंत मी ७१ फुलांच्यावर लिहिले आहे. पण सध्या थोड्या कौटुंबिक कारणांमुळे मी सकाळ सदर मधून काही दिवसां साठी रजा घेत आहे.. लवकरच वेगळा विषय घेऊन तुमच्या भेटीला अवश्य येईन. तुमच्या प्रेम ऋणात राहणे मला नेहमीच आवडेल..

भूपाळी पासून सुरू झालेला हा माझा प्रवास (प्रभात सदर) आज मी तुळशीवर मारवा लिहून विराम घेते..

पहाट पूर्व प्रभा लोभस
तांबूस किरणे कोवळी
मंद मंद झुळूक वाऱ्याची
कृष्ण तुळस डोले सावळी

तुळशीच्या शुभ दर्शनाने
आनंद तृप्तता नांदे अंतरी
तिची पाने आणि मंजिरी
आयुर्वेदीक व गुणकारी

शुभंकर सहवास पुण्यदाई



सायंकाळी लावते सांजदिवा
तिचा आशिर्वाद नीत मिळू दे
काही दिनासाठी हा मारवा...

# ट्रेकिंग आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

ज्योतिर्मय साहित्य

मला भटकंती करायला आणि निसर्गरम्य, धार्मिक, ऐतिहासिक ठिकाणांना भेट द्यायला नेहमीच आवडतं. भारत विविधतेचा देश असून महाराष्ट्र सह्याद्रीच्या निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. या छंदामुळे मला अनेक ठिकाणी फिरता आले आणि अनुभव समृद्ध करता आला.

छंद हा केवळ वेळ घालवण्याचा विषय नसून तो आनंदाचा स्रोत आहे. लहानपणी असलेला माझा ट्रेकिंगचा छंद संसारात थोडा मागे पडला होता, पण वयाच्या चाळिशीनंतर मुलाच्या सोबतीने व मित्रांच्या प्रेरणेने तो पुन्हा सुरू केला. आजवर सह्याद्री व हिमालयातील मिळून १९२ ट्रेक्स मी पूर्ण केले आहेत. हा प्रवास केवळ माझ्यासाठीच नाही तर माझ्यासोबत चालणाऱ्या अनेक मित्रमैत्रिणींसाठीही आनंदाचा ठरला.

आपण हे पाहूया,

हायकिंग ट्रेकिंग माउंटेनियरिंग : यात फरक काय?

१) हायकिंग : तुलनेने सोप्या वाटांवर चालणे. रायगड, लोहगड, सिंहगड यांसारखे गड हायकिंगसाठी योग्य.

२)ट्रेकिंग

: सलग अनेक दिवस डोंगर-दऱ्यांमधून चालत केलेला प्रवास. यामध्ये अधिक अंतर आणि जास्त मेहनत असते.

३)माउंटेनियरिंग (पर्वतारोहण) :

सर्वात आव्हानात्मक प्रकार. यात तांत्रिक प्रशिक्षण आवश्यक असते.



मराठीत ट्रेकिंगचा अर्थ मला नेहमी असा वाटतो “टेकडी चढण्याच्या क्रियेतली गंमत.”

माझ्यासाठी ट्रेकिंग म्हणजे काय?

ट्रेकिंग म्हणजे

रोजच्या धावपळीतून स्वतःसाठी काढलेला वेळ.

निसर्गाच्या सानिध्यात मिळालेला श्वास.

इतिहासाशी जवळीक.

स्वतःच्या ताकदीची ओळख.

डोंगर चढताना जशी शारीरिक व मानसिक कसोटी लागते, तशीच जीवनातील आव्हानांना सामोरे जाताना होते. शिखरावर पोहोचल्यावर जी उत्साहाची भावना येते, तीच जीवनातील अडचणींवर मात करून मिळणाऱ्या यशासारखी आहे.

TREKING – माझ्या दृष्टीने अर्थ आणि त्याचा लाँग फॉर्म

T – Teach youself powerful Thoughts

R – Redevelop yourself

E – Ethics,Energy & Emotions

K – knowledge & Karma

I -- Intuition, Inspiration

N -- Navigation of life


G -- Grateful attitude


म्हणजेच

“आपल्या विचारांना सामर्थ्य द्या, स्वतःला नव्याने घडवा, ऊर्जा आणि भावना संतुलित ठेवा, स्वतःला आणि आजूबाजूच्या लोकांना प्रोत्साहित करा, आणि आपल्या कर्मातून आनंद मिळवा.” वेगळ्या गोष्टींचा ज्ञान घ्या, कारण ट्रेकिंग मध्ये आपल्याला अफलातून वेगवेगळी लोक भेटत असतात. आणि ती वेगळ्याच पद्धतीने जीवन जगायला शिकवून जात असतात.




निष्कर्ष – छंद जोपासणे ही आयुष्य जगण्याची कला आहे. कोणत्याही वयात ट्रेकिंग करता येतं आणि तो अनुभव मनाला नवी ऊर्जा देतो. निसर्ग शिकवतो की आयुष्य म्हणजे सतत पुढे चालत राहणे, कोणत्याही परिस्थितीत आपल्या आयुष्यात निसर्गाप्रमाणे बहरने, उमलने मुक्त होणे,आपलं अस्तित्व सिद्ध करणे, जसं निसर्गात एखाद्या दगडावरती छोटसं फुल उमललेलं दिसतं तेव्हा आपल्या मनाला खूपच सुख मिळून जात, तिथे आपण हे लक्षात घेतलं पाहिजे त्याच्या आजूबाजूला कोणीही नसतं त्या दगडावरती धड मातीही नसते शेवाळ ही नसते तरी तिथे ते फुल उमलून स्वतःचा अस्तित्वाचा सिद्धता देऊन त्याच्या सौंदर्याने आपल्याला त्याच्या मोहात पाडून खूप सुख देतं, अगदी असंच आपलं आयुष्य आपण जगावं. अडचणींवर मात करत, शिखरावरती जाण्याचा प्रयत्न करावा आणि प्रत्येक शिखरावर पोहोचल्यावर आनंद साजरा करावा. वर्गात जाऊन आपलं स्वतःशी असा एक सुंदर नातं बनवाव. आणि सुंदर असलेला आपला आयुष्य भरभरून जगाव. माझ्यासाठी ट्रेकिंग म्हणजे साधना, मेडिटेशन आणि स्वतःशी केलेली प्रामाणिक भेट, आणि आपल्यातल्याच आतल्या आपल्या शी केलेली निखळ मैत्री. स्वतःशी जोडलेलं एक खंबीर नेतृत्व आणि नातं .





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

# मैत्रीपर्व : गुरुदेव, स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद

स्वामीजींनी नंतर आपल्या कार्याच्या विस्तारासाठी संन्याशांचा संघ स्थापन केला आणि त्या माध्यमातून हिंदू धर्म जागृतीच्या चळवळीला प्रारंभ केला. असे करताना ते केवळ जुन्या धर्मकल्पना किंवा रुढीपरंपरांना चिकटून बसले नाहीत तर पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारांची सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांचे गुरुदेवांना कौतुक होते. स्वामीजी तरुणांना स्वाभिमान आणि स्वावलंबनाची शिकवण देत होते ही गोष्टही गुरुदेवांना अतिशय आवडणारी होती. किंबहुना त्यांचेही जीवनध्येय तेच होते. स्वामीजींप्रमाणेच गुरुदेवांनी उज्वल भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रचार आणि प्रसार केला. स्वामीजींच्या अल्प आयुष्याच्या तुलनेत गुरुदेवांना या कार्यासाठी दीर्घायुष्य लाभले. योगी अरविंद हे गुरुदेवांपेक्षा वयाने अकरा वर्षांनी लहान होते परंतु त्यांची वैचारिक प्रगल्भता जबरदस्त होती. इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना वयाच्या सातव्या वर्षीच इंग्लंडला पाठवले. ते अत्यंत बुद्धिमान असल्यामुळे आयसीएस परीक्षा सहज उत्तीर्ण होऊ शकले असते परंतु हेतूपुरस्सर त्यांनी त्या परीक्षेत घोडेस्वारीची परीक्षा देणे टाळले आणि मुद्दाम अनुत्तीर्ण झाले कारण त्यांना इंग्रजांची चाकरी करायचीच नव्हती. पुढे त्यांनी काही काळ बडोद्याच्या सयाजीराव महाराजांकडे सेवा केली आणि नंतर काही काळ इंग्रजी आणि फ्रेंच भाषेचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. पुढे त्यांनी वंदेमातरम या इंग्रजी दैनिकाचे संपादन केले आणि विविध विषयांवर लेखन करून बंगाली तरुणांमध्ये नवचैतन्य जागृत करण्याचे कार्य केले. त्यांचा कोणताही गुन्हा नसताना इंग्रजांनी त्यांना एका बॉम्ब हल्ल्याच्या खटल्यात गोवले होते. त्यातून दोषमुक्त झाल्यानंतर ते परागंदा झाले. पण ते पळून वगैरे गेले नव्हते तर त्यांनी पाँडेचेरीला प्रयाण केले आणि तेथे जवळपास ४० वर्षे योगसाधना केली आणि त्यातून अध्यात्मातील एका उच्च अवस्थेपर्यंत त्यांचा प्रवास झाला. इथेच गुरुदेवांची आणि त्यांची पुन्हा भेट झाली यावेळी गुरुदेव परदेश दौऱ्यासाठी निघाले होते परंतु त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांनी विश्रांती घेण्याचे ठरवले आणि त्यादरम्यान योगी अरविंद यांची भेट घेण्याचे निश्चित केले. त्या काळात योगी अरविंद आपल्या ध्यान साधनेमुळे कोणालाही भेटत नव्हते. योगी अरविंद यांच्या फ्रेंच शिष्य मीरा अल्फासा त्यावेळी आश्रमाचे काम पाहत होत्या. त्यांना माताजी म्हणून सर्व ओळखत होते. गुरुदेवांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि योगी अरविंद यांच्या भेटीची विनंती केली. रवींद्रनाथ आपली भेट घेऊ इच्छित आहेत हे कळल्यानंतर योगी अरविंद यांनी आपले सर्व नियम बाजूला ठेवून गुरुदेवांची भेट घेतली. योगी अरविंदांकडे पाहिल्यानंतर पहिल्याच दृष्टिक्षेपात गुरुदेवांना त्यांच्या उच्च अध्यात्मिक साधनेची जाणीव झाली. त्यांनी इतर योग्यांप्रमाणे आपल्या देहाला क्लेश दिले नव्हते तर त्यांच्या चेहऱ्यावर शांत आणि सौंदर्यपूर्ण असे हास्य आणि तेज विराजमान होते. एका योग्याची ती तेजस्वी मुद्रा होती. त्यांची ती आत्मसाक्षात्कारी अवस्था पाहिल्यानंतर गुरुदेवांनी त्यांना अरविंद रोबिंद्रेर लह नमस्कार ( हे अरविंदा, तुला रवींद्रचा नमस्कार असो ) असे मनातल्या मनात म्हटले आणि त्यांचा निरोप घेतला. योगी अरविंद गुरुदेवांच्या कवितांचे चाहते होते. त्यांनी गुरुदेवांना साक्षात्कारी कवी म्हटले आहे. स्वामी विवेकानंद योगी अरविंद आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर या तिघांनाही हे माहिती होते की राजकारण हा काही मानवाच्या विकासाचा आणि कल्याणाचा मार्ग नाही माणूस घडवणे हे महत्त्वाचे आहे आज माणूस जाणिवेच्या ज्या पातळीवर उभा आहे त्यापेक्षाही अधिक पुढच्या पातळीवर किंवा पायरीवर गेल्याशिवाय त्याला पुढील गोष्टी नीट दिसणार नाही किंवा परिस्थितीचे योग्य आकलन होणार नाही याबाबत या तिघाही महामानवांचे एकमत होते असे दिसते. हेच त्यांचे मोठेपण आहे.



ज्योतिर्मय साहित्य


**ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान,मराठवाडा, संभाजीनगर चा २८ वा वर्धापन दिना निमित्त्य स्मरणिकेचे प्रकाशन सर संघसंचालक मा. श्री.डॉ.मोहनजी भागवत यांच्या शुभास्ते दि.२३/८/२५ रोजी तापडीया नाट्यगृहात संपन्न झाले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.अशोक दिवाण,स्मरणिका संपादक श्री.बिडवई व सहसंपादक डॉ.श्याम कुलकर्णी,कार्याध्यक्ष डॉ.आबा देशपांडे,सचिव डॉ.डावरे व कार्यकारणी विविध पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी पशुवैद्यकीय क्षेत्रात विविध स्तरावर कार्य करणार्या व्यक्तींचा कार्यगौरव करण्यात आला.प्रसंगी मराठवाडा व महाराष्ट्रातील अनेक पशुवैद्यक उपस्थित होते!**







ज्योतिर्मय साहित्य




सर्व अंध व्यक्ती हत्तीला स्पर्श करून तो कसा आहे याचा अंदाज मनामध्ये बांधत होते. आणि आता ते आपसात बोलू लागले. त्यापैकी ज्याने हत्तीच्या सोंडेला स्पर्श करून पाहिला तो म्हणे हत्ती मुसळासारखा आहे. ज्याने हत्तीच्या पायाला स्पर्श करून जाणवला तो अंध व्यक्ती हत्ती खांबासारखा आहे असे म्हणू लागला. ज्याने हत्तीच्या शेपटीला स्पर्श केला तो व्यक्ती हत्ती झाडू सारखा आहे असे आग्रहाने सांगू लागला. एका अंध व्यक्तीने हत्तीच्या कानाला स्पर्श केला आणि तो आपले मत ठामपणे मांडू लागला की हत्ती सुपा सारखा आहे...

हत्ती विषयी हत्ती कसा आहे हे स्पष्ट करण्यासाठी सर्व अंध व्यक्ती एकमेकांशी आता जोरजोरात बोलू लागले. प्रत्येक जण म्हणत होता की माझेच म्हणणे बरोबर आहे, मी म्हणतो तसाच हत्ती आहे. काही वेळाने त्यांच्या विवादाचे रूपांतर परस्पर भांडणांमध्ये झाले. प्रत्येक अंध व्यक्ती आपल्या मताचा दुराग्रह करू लागला.

याचवेळी त्यांच्या बाजूने एक सुशिक्षित समजदार व्यक्ती जात होता. त्याने पाहिले की काही अंध व्यक्ती हत्तीच्या स्वरूपाविषयी आपसात भांडत आहेत, तो जवळ आला त्यांनी त्या सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले. आणि त्यांना एका बाजूला घेऊन गेला. विवाद करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी स्पष्टीकरण दिले की तुमचे सर्वांचे म्हणणे बरोबर आहे. कोणीही चुकीचा नाही. परंतु तुम्ही हत्तीच्या एका अवयवाला स्पर्श केलेला आहे, आणि हत्ती केवळ त्याच स्वरूपाचा आहे असा आग्रह करत आहात. तुम्ही सर्वजण जे म्हणत आहात ते सर्व मिळून हत्तीचे पूर्ण अवयव होतात. आणि त्या सर्वांचा मिळून एक हत्ती होतो.

त्या व्यक्तीच्या संबोधनानंतर सर्व अंध व्यक्तींच्या लक्षात आले की आपल्या सर्वांचं म्हणणं बरोबर आहे परंतु आपला समन्वय नसल्यामुळे वाद विवाद होत आहेत. आपण समजदारीची भूमिका घेतली आणि दुसऱ्याच्या मताचा आदर केला तर आपले आपसात वाद होणार नाहीत असा बोध घेऊन सर्वजण शांततेने गावात परतले.

**इतरांच्या मताचा आदर**

या गोष्टीवरून आपल्याला एवढाच बोध घ्यायचा आहे की आपले मत मांडत असताना दुसऱ्याच्या मताचा आदर केला पाहिजे. आणि केवळ आपलेच मत ग्राह्य असावे असा दूराग्रह नसावा.

कारण सत्य एकांगी नसते, ते अनेक अंगी असते. त्यापैकी सर्व अंग खरे असतात. कोणते एकच अंग खरे आहे आणि दुसरी बाजू खरी नाही हा दुराग्रह कामाचा नसतो. सत्य असीम आहे , भाषेला सीमा आहे, अभिव्यक्ती त्याहून कमकुवत असते. प्रत्येक जण आपल्या बुद्धीप्रमाणे आणि प्राप्य शक्तीने व्यक्त होत असतो.

पाण्याने अर्धवट भरलेला ग्लास :

एखादा ग्लास अर्धा भरलेला आहे हे खरे, तसेच तो अर्धा रिकामा आहे हेही खरेच. ग्लास काचेचा आहे किंवा स्टीलचा आहे हेही चुकीचे नाही. ग्लास टेबलावर आहे किंवा जमिनीवर आहे हेही सत्यच. ग्लासमध्ये अर्धे पाणी आणि अर्धी हवा आहे हे सत्यही नाकारता येणार नाही. म्हणून सत्य अनेकांगी आहे, एकांगी नाही. हेच खरे. असाच अर्थबोध आपणास घ्यावयाचा आहे.

दुराग्रह नको

आपण ज्यावेळी केवळ आपल्याच विचारांचा आग्रह करतो त्यावेळी तो दुराग्रह बनत असतो. केवळ आपल्याच दृष्टिकोनाचा आग्रह न बाळगता दुसऱ्याने व्यक्त केलेल्या विचारातही काही तथ्य असेल असे मत असावे. याचाच अर्थ इतरांच्या विचाराबद्दल सहिष्णू बनणे. परस्पर वाद विवाद न होऊ देण्यासाठी वैचारिक सहिष्णुता खूप महत्त्वाची असते. आपल्या स्वतःच्या भावनांवरती आपले नियंत्रण असावे. इतरांच्या विचारांना समजण्याचा प्रयत्न असावा. प्रत्येकाने स्वतःच्या गर्व आणि अहंकाराला महत्त्व दिले तर कुटुंबात, समाजात आणि जगामध्ये शांतीपूर्ण सह-अस्तित्व आणि स्थिरता नांदू शकत नाही.



# आधी वंदू तूझं मोरया...

**ज्योतिर्मय साहित्य**

गणेशोत्सवाचे आगमनाआधीच पुण्यामध्ये एकच लंगबग असते. बाजारपेठा हार, मुकुट, निरनिराळे आकर्षक वस्त्र, सजावटीच्या साहित्याने गजबजल्या असतात. आकर्षक गणपतीच्या मूर्ती आपले लक्ष वेधून घेतात.महिनाभर आधीच मुर्त्यांचे बुकिंग सुरु झाले असते. गणपती म्हणजे विद्येची देवता.पुणे म्हणजे विद्येचं माहेरघर. पुणे म्हणजे सांस्कृतिक राजधानी, सुसंस्कृत शहर म्हणून पुण्याची विशेष ओळख आहे. पुण्याला प्राचीन आणि ऐतिहासिक नगरी म्हटलं जातं. पुण्यात वर्षभर सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक आणि राजकीय अशा सगळ्याच प्रकारच्या कार्यक्रमांची रेलचेल असते.अनेक विशेष कार्यक्रम आयोजित केलेले असतात. आणि म्हणूनच ‘पुणे तिथे काय उणे नेहमीच म्हटले जाते पुण्यातील अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

पुण्यातील गणेशोत्सवांचा नावलौकिक जगभर आहे. गणेशोत्सव म्हणजे पुणे. पुण्याची वैभवशाली परंपरा आहे. पुण्यातील इतिहासकालीन प्राचीन मंदिरांची स्वतःची अशी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येकामागे काहीतरी आख्यायिका आहेत. प्रत्येक मंदिराचे महत्त्व विशद करताना ते आपणास दिसून येते. पुण्यात गणपतीच्या दर्शनासाठी जगभरातून लोक येतात. महाराष्ट्रात सगळीकडेच गणेशोत्सव जोरदार साजरा केला जातो.पुण्यात विशेष म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात म्हणजे स्थापनेपासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत लाखोंच्या संख्येने भावीक पुण्याचे गणपती पाहण्यासाठी मुद्दाम येत असतात. दोनचार दिवस मुक्काम करून ते गणपती दर्शन घेत असतात. त्यामुळे या काळात पुण्यामध्ये एक वेगळच वातावरण निर्माण झालेले असते. उत्साह बरोबरीने रस्तेही ओसंडून वाहात असतात. गणपती समोरचे निरनिराळ्या प्रकारचे देखावे मनाला आकर्षित करुन घेतात. या काळात पुण्यातील सर्वच लॉज फुल असतात. ॲडव्हान्स मध्ये बुकिंग करून ठेवले असते.

पुण्यात आल्यानंतर मानाचे गणपती म्हटले जातात त्यासोबत अजूनही प्रसिद्ध मानाचे गणपती आहेत. ती नेमकी कोणती आहेत ते आपण बघू. ज्यावेळी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले गेले आणि गणपतीच्या मिरवणुकीचा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेला लोकमान्य टिळक, भाऊसाहेब रंगारी, खाजगीवाले, घोटावडेकर, आणि ब्रह्मवृंद यांनी व्यवस्थेचा एक भाग म्हणून त्यावेळेला ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीला पहिला अग्रक्रम दिला तसेच ग्रामदेवता असलेल्या तांबडा जोगेश्वरी गणपतीला दुसरा क्रम दिला हा व्यवस्थेचा भाग म्हणून होते. अर्थातच सर्वच गणपती हे मानाचे आहेत. आपण त्यांच्या मानाचे क्रम ठरवणारे कोण ? आपण त्यांचा क्रम लावू शकत नाही. गजानना श्री गणराया.. आधी वंदू तुज मोरया.. यातच सर्व आले.

पुण्यातील प्रसिद्ध गणपती (मानाचे गणपती) खालीलप्रमाणे




आहेत:

१) कसबा गणपती हे पुण्याची ग्रामदैवत आहे. शहरातील पहिला पानाचा गणपती म्हणून याची ओळख आहे. या गणपतीची स्थापना जरी जिजाऊंनी केली असली तरी १८९३ मध्ये मंडळाद्वारे सुरुवात झाली.

मानाच्या गणपतींपैकी पहिला गणपती म्हणजे पुण्याचे प्रमुख दैवत असणारा कसबा गणपती. कसबा गणपती हा तांदळा स्वरूपात आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, या गणपतीच्या डोळ्यांत हिरे आणि नाभीस्थानी माणिक बसवलेला आहे. ह्या मूर्तीकडे पाहिल्यानंतर अष्टविनायकातील बल्लाळेश्वर मूर्तीचा भास होतो असे म्हणतात. मूर्तीला चांदीची महिरप केली गेली आहे. गेली १३० वर्षे गणेशोत्सवासाठी घडविल्या जाणाऱ्या मूर्तीचे आगमन आणि विसर्जन हे चांदीच्या पालखीतून होत असते. नवसाला पावणारा, अशी या स्वयंभू गणेशाची ख्याती आहे.

२) तांबडी जोगेश्वरी गणपती हा गणपती पुण्यातील दुसरा मानाचा गणपती आहे.

यानंतर मान येतो तो तांबडी जोगेश्वरीच्या गणपतीचा.. पुण्याची ग्रामदेवता म्हणून तांबडी जोगेश्वरीला ओळखले जाते. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, याचे श्रीमुख हे आफ्रिकन हत्तीचा चेहरा आहे. आगमनाची मिरवणूक ही रथातून, तर विसर्जन हे पालखीतून केले जाते. सुरुवातीला देव्हारा हा पितळेचा होता. काही काळानंतर मंडळाच्या सभासदांनी दिलेल्या देणगीतून चांदीचा देव्हारा बनवून मूर्तिपूजन केले जाते. कमळावर बसलेला सोन्याचांदीच्या आभूषणांनी संपन्न असा हा गणपती आहे. वेगवेगळ्या प्रकारचे मुकुट असले तरीही हिरेजडित असा एक सोन्याचा हार हा कायमच गजाननाच्या गळ्यात असतो. गणपती बाप्पाला पुणेरी पगडीदेखील घातली जाते. अतिशय सुंदर प्रकारे सोवळे नेसवले जाते. विसर्जनाच्या वेळी तर चांदीच्या पालखीसोबतच छत्र चामरे, नक्षत्रमाला, अब्दागिऱ्या हे मिरवणुकीची शोभा वाढवतात. एकूणच गजाननाचे स्वरूप हे चैतन्यमय असते.

३) गुरुजी तालीम गणपती हा तिसरा मानाचा गणपती आहे.

यानंतर येणारा गणपती म्हणजेच गुरुजी तालीम मंडळ. १८५७ साली स्थापन झालेल्या या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे हा उंदरावर (मूषकावर) विराजमान आहे. पाहायला अतिशय लोभसवाणा हा गणपती कलाकृतीचा उत्तम नमुना असणारे मुकुट, विविध आयुधे, हार ह्यांनी सजलेला आहे. शोभा वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे हिरेमाणिक दागिन्यांमध्ये आहेत. मिरवणुकीच्या काळात तर विविध ढोलताशा, लेझीम पथक गणपतीच्या विसर्जनात एक वेगळा रंग भरतात.

४) तुळशीबाग गणपती पुण्यातील चौथा मानाचा गणपती आहे.

पुण्यातल्या अतिशय प्रसिद्ध जागांपैकी एक तुळशीबाग हे ठिकाण आहे येथील गणपतीला मानाचा चौथा गणपती मानले जाते. १९०१ मध्ये या गणपतीची स्थापना करण्यात आली. १९७५ मध्ये पहिल्यांदा फायबरची मूर्ती स्थापित करणारे हे पहिले मंडळ ठरले. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, ही तेरा फूट उंच असून अनेक सुंदर कल्पक अशा आभूषणांनी सजवली जाते. तुळशीबागेतील ह्या मूर्तीची सजावट डोळ्यांना दिपवणारी असते. ह्या गणपतीला मागे चांदीची महिरप असून सोबतच मुकुट, कान, पाय, हात, आयुध, उंदीर, मोदक, नाग तसेच सोंडपट्टी आणि पाटदेखील चांदीचा आहे. साधारणपणे २०० किलोहून अधिक चांदीचे आभूषणे आहेत. रेशीम तसेच मलमलची सोवळी, उपरणी ही बाप्पासाठी तयार केली जातात. इतकेच नाही तर जगभरातील अनेक भक्तगण सोन्याचांदीचे दूर्वा, मोदक यांसारखी तत्सम आभूषणे देवाला अर्पणदेखील करतात. सगळ्यांचा लाडका असणाऱ्या गजाननाची गजाननाचे लाड प्रत्येक जण आपापल्या कुवतीनुसार करताना दिसतात. मंडळातर्फे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अन्नदान सेवा त्यांच्याकडून राबवली जाते. दरवर्षी यज्ञ केला जातो.

५) केसरी वाडा गणपती हा पुण्यातील पाचवा मानाचा गणपती आहे

सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्यात टिळकांचा पुढाकार असल्याने मानाचा पाचवा गणपती म्हणून त्यांनीच स्थापना केलेल्या केसरीवाड्याच्या गणपतीला ओळखले जाते. हे मंडळ अत्यंत उत्साहात, परंपरेचे पालन करीत गणेशोत्सव साजरा करतात. गायकवाड यांनी हा वाडा बांधला असून सध्या इथे दोन गणपतींची पूजा केली जाते. त्यापैकी एका मूर्तीची कायमस्वरूपी स्थापना केलेली असून दुसरी मूर्ती ही गणेशोत्सवात दहा दिवस पूजली जाते आणि मग विसर्जित केली जाते. कायमस्वरूपी मूर्ती ही चांदीची आहे जी ज्ञानेश्वरीतील वर्णनाप्रमाणे घडविली आहे. मूर्तीला सहा हात असून हातांत परशू, पाशांकुश, चंद्र आणि हस्तिदंत आहेत. मूर्तीला पगडी घातली जाते. ऐतिहासिक घडामोडींचा वारसा असल्याने केसरीवाड्याला एक महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकमान्य टिळकांच्या विचारांचा वसा आजही मंडळ अविरतपणे पुढे सुरू ठेवले असल्याचे पाहायला मिळते.

अजूनही पुण्यात मनाचे काही प्रसिद्ध गणपती आहेत त्यांचा परिचय आता पाहुयात.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती –

मानाच्या गणपतींसोबतच जगप्रसिद्ध असलेल्या गणपतींपैकी



दिलीप देशपांडे
जळगाव

एक म्हणजे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती. १८९३ मध्ये या गणपतीची स्थापना झाली आणि १९८४ मध्ये मूर्तीची स्थापना मंडळाने केली. कर्नाटकचे प्रसिद्ध मूर्तिकार शिल्पींनी ही मूर्ती घडवली ज्यात गणेश यंत्र बसवले. सोन्याचा मुकुट, कान, पाय, विविध आयुधे, रुद्राक्षाचा हार, वैभव हार असे अनेक सोन्याचांदीचे हिरेजडित दागिने हे गणपतीला असून केवळ वस्तूंनीच नव्हे, तर सांस्कृतिक- सामाजिक क्षेत्रात स्वतःची असलेली बांधिलकी जाणत काम करणारा आणि अशा प्रकारे श्रीमंत ठरणारा हा दगडूशेठ गणपती सगळ्यांचाच लाडका आहे. अनेक प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक सेवा मंडळ मार्फत पुरवल्या जातात. संपूर्ण मंदिराचा परिसर हा भावभक्तीच्या सुगंधाने दरवळणारा असतो. ह्याची ख्याती इतकी आहे की, पुण्यात येणारी व्यक्ती ही प्रथम दगडूशेठ गणपती दर्शन घेऊन, आशीर्वाद घेउनच जातो. वर्षभरात अनेक मान्यवर सेलिब्रिटी राजकीय नेते धार्मिक अध्यात्मिक क्षेत्रात प्रसिद्ध व्यक्ती असे सारे या गणपतीचे दर्शन घेतल्याशिवाय जात नाही.

भाऊसाहेब रंगारी गणपती–

भाऊसाहेब रंगारी हे राजवैद्य होते.१८९२ साली भाऊसाहेब रंगारी यांनी आणि त्यांच्या तेरा सहकाऱ्यांनी मिळून सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला

भाऊसाहेब रंगारी यांचं मूळ नाव भाऊ लक्ष्मण जावळे होते. सार्वजनिक गणेशोत्सवात त्यांचं महत्त्वाचं नाव मानलं जातं. भाऊसाहेब हे त्याकाळी राजवैद्य होते. शालूंना रंग देण्याचा त्यांचा पारंपारिक व्यावसाय होता. त्यावरुन त्यांना रंगारी हे उपनाव पडल.

हा गणपती चार हातांचा आहे. गणपतीने राक्षसाचा एक हात सोंडेत धरलेला आहे. गणपतीने आपला मोडलेला दात आयुध म्हणून हाती धरलेला आहे आणि एका हाताने राक्षसाचे केसदेखील पकडले आहेत, अनेक उपक्रम या मंडळामार्फत वर्षभरात राबवले जातात डी.जे मुक्त गणेशोत्सव याविषयी आता प्रयत्न करत आहेत.

मंडई मंडळाचा शारदा गजानन –

महात्मा फुले मंडई ही पुण्यातील ऐतिहासिक वारसा असणारी वास्तू आहे. मंडई ही तशी समाजातील सर्व वर्गांतील लोकांनी एकत्र येण्याची जागा. अशाच ठिकाणाचा, अनेकांचा श्रध्दास्थान असणारा आपलासा वाटणारा गणपती म्हणजेच मंडई मंडळाचा शारदा गजानन. उजव्या सोंडेचा हा गणपती तक्क्याला रेलून आसनस्थ आहे. बाप्पाचा एक पाय शारदेने मांडीवर घेतला असून ती तो चेपत असून पालथी मांडी घातलेल्या शारदेच्या उजव्या खांद्यावर गणपतीने डावा हात ठेवला आहे. या गणपतीच्या बाजूला मूषकाची चांदीची प्रतिमादेखील आहे. दोन्ही मूर्तीचे नक्षीकाम उठावदार आहे. त्यामुळे कानात घातलेला दागिना आपल्याला स्पष्ट दिसतो. अत्यंत बोलकी अशी ही मूर्ती आहे. मूर्तीची महिरप, पाट चांदीचा असून सोबतच सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी हा गणपती सजलेला आहे. गणपती तसेच शारदेस अनेक प्रकारच्या साड्यांनी, उपरण्यांनी सजविले जाते. रेशम, मलमलच्या वस्त्रांचा प्रामुख्याने उपयोग होतो. मंडईच्या लगत




असूनही या गणपतीचे मंदिर कमालीचे शांत भासते.

जिलब्या मारुती मंडळाचा गणपती –

पुण्यातील मंदिरांची नावेही वैविध्यपूर्ण असतात. जिलब्या मारुती मंडळाचा गणपती हे त्यापैकीच एक उदाहरण. १९५४ मध्ये या गणपतीची स्थापना झाली. येथे असणाऱ्या मारुतीला पूर्वी जिलब्यांचा नैवेद्य दाखवला जात असतो म्हणून त्याचे नाव जिलब्या मारुती पडले. नंतर मंडळाने गणपतीची स्थापना केल्यावर २१ किलो जिलब्यांचा नैवेद्य दाखवतात. सोन्याचांदीचे विविध आभूषणे,कमळ, रुद्राक्ष हार, ओम सोन्याचे दात, सोनसाखळी अशा अनेक दागिन्यांनी सजलेला हा गणपती आहे. या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे गेली दहा वर्षे या गणपतीला पुणेरी फेटा बांधला जातो. अत्यंत बोलके डोळे असणाऱ्या ह्या गणपतीची मूर्ती विलोभनीय आहे.

हत्ती गणपतीची –

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळामध्ये हत्ती गणपतीची स्थापना झाली. पुण्यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत असताना १८९३ साली हत्ती गणपती मंडळाची स्थापना करण्यात आली. देवकर, पानसरे, पडवळ आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी ही स्थापना केली. गणरायाचे रुप हत्तींशी एकरुप झालेले आहे हे तर आपल्याला माहितीच आहे. पण या गणपतीला हत्ती गणपती असे नाव का पडले असा प्रश्न निर्माण होतो. याचे उत्तर म्हणजे गणरायाचे वाहन मुषकराज असले तरी हत्ती गणपती हा हत्तीवर विराजमान झालेला आहे.

सध्या विराजमान असलेली हत्ती गणपतीची ही तिसरी मूर्ती आहे. मूर्ती रुप अत्यंत प्रभावी आणि देखणे आहे. गणराय पद्मासनामध्ये अभय देतानाची मूर्ती आपण अनेकदा पाहतो. पण हत्ती गणपती हा हत्तीवर लढाईसाठी स्वार झालेला आहे. हत्तीच्या खाली वाघ असून गणराय वाघाला मारत आहे. हा वाघ इंग्रजांच्या माजलेल्या सत्तेचे रुपक आहे. या इंग्रज मदमस्त सत्ता आणि जाचक प्रवृत्तीचे संहार करताना गणराया दिसून येत आहे. गणरायाची मूर्ती १३ फूट उंचीची असून गणरायाच्या हातांमध्ये शस्त्र आहे. मागच्या उजव्या हातामध्ये परशू तर डाव्या हातामध्ये गदा आहे. पुढील दोन्ही हाताने गणरायाने त्रिशुल उगारले आहे. या हत्ती गणपती मंडळाला १३४ वर्षांचा इतिहास आहे. पुण्यातील अनेक शतकोत्सव पार केलेल्या गणपतींपैकी हत्ती गणपती.

शिवकालीन, पेशवेकालीन आणि त्यानंतर टिळकांनी सुरु केलेल्या गणेशत्सवाचा पुणे शहर साक्षीदार आहे. मोठ्या इतिहासाचादेखील साक्षीदार आहे. अनेक रंजक कथा, पौराणिक गोष्टी आणि ऐतिहासिक वारसा आपल्याला पुण्यातील गणेशोत्सवात पाहायला मिळतो.

मानाचे पाच गणपती, महत्वाचे काही गणपती, रंजक नावे असलेले गणपती आणि त्यानंतर येतात तालमीतील गणपती. पुण्यात अनेक तालमीत गणेशोत्सव साजरा केला जात होता. त्यांच्या नावाने गणेशोत्सव साजरा होतो. गणेशोत्सवाच्या काळात या सर्व मंडळांमध्ये धार्मिक सामाजिक सांस्कृतिक आणि संगीत विषय कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केलेले असते.

ऐन गणेशोत्सवात पुण्यात येणे, पुण्यातील गणपतीचे दर्शन घेणे, कार्यक्रमाचा लाभ घेणे, उकडीच्या मोदकांचा, पेढ्यांचे मोदकांचा प्रसाद ग्रहण करणे हा एक विशेष अनुभव आहे असे म्हणावे लागेल.

।। जय गजानन. ।।









हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559